# ICAR-KRISHI VIGYAN KENDRA
## Central Institute for Cotton Research
*(Indian Council of Agricultural Research)*
**Post Bag No. 2, Shankarnagar P. O., Nagpur – 440 010**
Ph No. 07103-275536, 275617 Ext. 350 Fax - 07103-275529
Email :- kvkcicrnagpur@gmail.com, kvk_cicr2007@rediffmail.com
**Office Location- Panjri farm, Near H.P. Depot, Wardha road, Nagpur**


## कुपोषणमुक्त भारत : विविध उपक्रमांचे आयोजन'महापोषण थाळी' प्रदर्शनातून जनजागृती

गुमगाव : 'कुपोषणमुक्त भारत ' बनविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय पोषण माह अभियानांतर्गत महिला व बालकल्याण विभाग तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वागधरा (नवीन गुमगाव) येथे 'महापोषण थाळी' आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय कापूस अनुसंधान संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ.एस. एम. वासनिक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बालविकास प्रकल्प अधिकारी बापूसाहेब चिंचाणे होते. यावेळी स्वस्थ भारत अभियानाच्या प्रेरक पूजा बनकर, सुनीता चव्हाण, पर्यवेक्षिका अलका खंते, उपसरपंच किशोर पडवे आदींची उपस्थिती होती. माता व बालकांना सशक्त बनविण्यासाठी व त्यांचे पोषण योग्यरित्या होण्याबरोबरच कुपोषण दूर करण्यासाठी हे अभियान महत्त्वाचे ठरणार असून , त्यासाठीच या महापोषण थाळी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच गरोदर व स्तनदा माताना द्यावा लागणारा आहार व काळजी याबाबत भेटीद्वारे समुपदेशन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विविध रानभाज्या, पोष्टिक नाश्ता, सणासुदीची थाळी , दैनंदिन जेवणातील विविध रेसिपीद्वारे सकस आहार थाळया सेविकांनी तयार केल्या होत्या. यात विजेत्या सेविकांना पुरस्काराने गौरविण्यात आले. सकस आहाराचे प्रात्यक्षिक, मोड आलेली कडधान्ये, विविध प्रकारच्या डाळीसह सकस आहार व्यंजनांचे प्रदर्शनही यावेळी भरविण्यात आले. गुमगाव या बिटांतर्गत २५ गावातील अंगणवाडी सेविका, मदतनीस या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे आयोजन तथा संचालन पर्य वेक्षिका अलका खंते यांनी केले. उपक्रमास अंगणवाडी सेविका मनीषा घोडे , वर्षा आस्कर, कुसुम खोब्रागडे, रेखा साबळे, संगीता उघडे, कल्पना बेलेकर, कुसुम वाडबुधे, संगीता इटनकर, मंदा चरपे, रिंकू मांदाडे, वीणा सेलवंटे, सुलोचना देवगडे, शोभा माहुरे आदींनी सहकार्य केले.

---

लोकमत

### कुपोषणमुक्त भारत : विविध उपक्रमांचे आयोजन
# 'महापोषण थाळी' प्रदर्शनातून जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

गुमगाव : 'कुपोषणमुक्त भारत' बनविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय पोषण माह अभियानांतर्गत महिला व बालकल्याण विभाग तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वागधरा (नवीन गुमगाव) येथे 'महापोषण थाळी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून पोषण आहाराबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय कापूस अनुसंधान संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. एस. एम. वासनिक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बालविकास प्रकल्प अधिकारी बापूसाहेब चिंचाणे होते.



प्रदर्शनातील उत्कृष्ट महापोषण थाळी सादर करणाऱ्या विजेत्यांचा गौरव करताना डॉ. एस. एम. वासनिक, बापूसाहेब चिंचाणे व मान्यवर.

यावेळी स्वस्थ भारत अभियानाच्या प्रेरक पूजा बनकर, सुनीता चव्हाण, पर्यवेक्षिका अलका खंते, सरपंच प्रेमनाथ पाटील, उपसरपंच किशोर पडवे आदींची उपस्थिती होती.

माता व बालकांना सशक्त बनविण्यासाठी व त्यांचे पोषण योग्यरित्या होण्याबरोबरच कुपोषण दूर करण्यासाठी हे अभियान महत्वाचे ठरणार असून, त्यासाठीच या महापोषण थाळी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोबतच गरोदर व स्तनदा मातांना द्यावा लागणारा आहार व काळजी याबाबत भेटीद्वारे समुपदेशन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विविध रानभाज्या, पौष्टिक नाश्ता, सणासुदीची थाळी, दैनंदिन जेवणातील विविध रेसिपीद्वारे सकस आहार थाळ्या सेविकांनी तयार केल्या होत्या. यात विजेत्या सेविकांना पुरस्काराने गौरविण्यात आले. सकस आहाराचे प्रात्यक्षिक, मोड आलेली कडधान्ये, विविध प्रकारच्या डाळीसह सकस आहा व्यंजनांचे प्रदर्शनही यावेळी भरविण्यात आले. गुमगाव बिटांतर्गत २५ गावातील अंगणवाडी सेविका, मदतनीस या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे आयोजन तथा संचालन पर्यवेक्षिका अलका खंते यांनी केले. उपक्रमास अंगणवाडी सेविका मनीषा घोडे, वर्षा आस्कर, कुसुम खोब्रागडे, रेखा साबळे, संगीता उघडे, कल्पना बेलेकर, कुसुम वाडबुधे, संगीता इटनकर, मंदा चरपे, रिंकू मांदाडे, वीणा सेलवंटे, सुलोचना देवगडे, शोभा माहुरे आदींनी सहकार्य केले.

Hello Nagpur Gramin
Page No. 3 Oct 07, 2020
Powered by: erelego.com